# परिशिष्ट-३

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

**महत्वाची टीपः-**

१. अद्ययावत माहितीसाठी कृपया www.mahashramm.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
२. कामगार विभागांतर्गत विविध परवाने / नोंदणी / नुतनीकरण इत्यादीसाठी आवश्यक असणाऱ्या विहित कागदपत्रासाठी कृपया www.mahashramm.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
३. कामगार विभागांतर्गत विविध परवाने / नोंदणी / नुतनीकरण इत्यादीबाबतची कागदपत्रे मिळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विहित कालमर्यादेबाबत कृपया www.mahashramm.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.


## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

## ध्येय (Mission)

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे कार्य मुख्यत्वे कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ मधील तरतुदीची अंमलबजावणी करण्याचे आहे. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची कारखानदाराकडून कोणत्याही प्रकारची पिळवणूक होणार नाही, तसेच त्यांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात काम करता यावे, म्हणून प्रभावीपणे कायद्यातील तरतुदीची अंमबजावणी साचालनालयाकडून केली जाते. त्याकरिता कारखाने निरिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. कारखान्यात होणाऱ्या अपघातांची चौकशी करुन भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत उपाययोजना करण्यासाठी कारखानदारांकडून कारखाने अधिनियम व त्या नियमांतर्गत तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन घेण्यात येते.

या संचालनालयाचे मुख्य ध्येय कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना कारखाने अधिनियम व महाराष्ट्र कारखाने नियम अंतर्गत तरतुदीची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊन त्याचे फायदे त्यांच्यापर्यन्त पोचविण्याचे आहे. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे मुख्य कार्यालय – कामगार भवन, ५वा मजला ब्लॉक-ई, सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१ येथे स्थित आहे.

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय



# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

*प्रास्ताविक*

महाराष्ट्र राज्य हे देशातील औद्योगिकदृष्या सर्वात अधिक प्रगत राज्य आहे. त्यामध्ये ३७०५९ नोंदणीकृत कारखाने असून त्यातील कामगारांची संख्या अंदाजे १२ लाख इतकी आहे. कापड कारखाने रासायनिक, अभियांत्रिकी, औषधी, खत कारखाने, जंतुनाकशे, पेट्रोकेमिकल्स, सिमेंट, कागद अशा मोठया उद्योग समुहाचाही समावेश आहे. या कारखान्यात उत्पादनात अनेक प्रकारच्या गुंतागुंतीच्या प्रक्रिया चालतात. ज्या लहान कारखान्यात धोकादायक, विषारी ज्वालाग्रही रसायने वापरली जातात त्या लहान उद्योगांना शासनाने अधिसुचना काढून कारखाने अधिनियम लागू केले आहेत. अशा सर्व प्रकारच्या कारखान्यातील कामगारांच्या प्रमुख्याने सुरक्षितता व आरोग्यविषयी अंमलबजावणीची जबाबदारी या संचालनालयावर सोपविण्यात आली आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, हे कामगार विभागाच्या अधिपत्याखाली असून संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य महाराष्ट्र राज्य हे विभागप्रमुख आहेत. याविभागाचे पूर्वीचे नाव 'कारखाने निरीक्षणालय' असे होते. शासनाने याविभागाचे तांत्रिक कामकाज पाहून त्याला अनुरुप नावात व अधिका-यांच्या पदनामात १९९१ साली बदल केला. या विभागाचे प्रमुख कार्यालय मुंबई येथे असून अपर संचालक तीन आहेत व ते मुंबई, पुणे व नागपूर येथे आहेत. विभागिय कार्यालये ठाणे, कल्याण, पनवेल, वसई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद येथे असून सह संचालक विभागीय प्रमुख आहेत. जिल्हा पातळीवरील कार्यालये सातारा, जळगाव, धुळे, अहमदनगर, सोलापूर, सांगली, अकोला, भंडारा, चंद्रपूर, अमरावती, नांदेड येथे असून उप संचालक कार्यालय प्रमुख आहेत. या विभागाच्या आस्थापनेवरील ३ अपर संचालक, १३ सह संचालक, ६४ उप संचालक व ५० सहाय्यक संचालक आहेत. वैद्यकिय शाखेत उपसंचालक (वैद्यकीय), सर्टिफाईंग सर्जन व इतर कर्मचारी वर्ग आहेत. मुंबई येथील संचालनालयात अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज इंडस्ट्रीयल हायजीन लॅबोरेटरी आहे. या संचालनालयातील सर्व अधिकारी रासायनिक, विद्युत, यांत्रिकी किंवा विविध विषयातील अभियांत्रिकी पद्वीधर आहेत.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे कामकाज मुख्यतः तांत्रिक स्वरुपाचे असून खालील कामगार व इतर कायद्यांच्या अंमलबजावणीचे कामकाज करण्यात येते.

## १) कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने अधिनियम १९६३.:

कारखान्यातील कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कारखाने अधिनियम हा सामाजिक कायदा १८८१ पासून अस्तित्वात आहे. त्यावेळी त्याची व्याप्ती कामगारांचे कामाचे तास, आठवडयाची सुट्टी, स्त्रिया व मुले यांचे विषयी तरतुदींचे सनियमन करणे इतकेच होते. त्यात १९११, १९२३, १९३५ मध्ये सुधारण होऊन १९४८ साली महत्वाच्या सुधारणा झाल्या. कामगारांच्या कामाच्या जागेची व यंत्राची सुरक्षितता, आरोग्य सुखसोयी (विश्रांती/ जेवणाच्या खोल्या पाळणाघर, उपचार खोली (ॲमब्युलन्स रुम) इक्ष्यादी, कामाचे तास आठवडयाची सुट्टी , पगारी रजा, धोकादायक प्रक्रियेत काम करताना पाळावयाच्या तरतुदींचा समावेश आहे.

भोपाळ वायुगळतीच्या दुर्घटनेनंतर १९८७ मध्ये रासायनिक कारखान्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अमुलाग्र बदल करण्यात आले. कामगारांना कारखान्यात काम करताना सुरक्षितता व आरोग्यविषयी हमी घेण्याची जबादारी भोगवटादारावर टाकण्यात आली.

२) **कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ :**

ज्या ठिकाणी कामगार राज्य विमायोजना अस्तित्वात नाही अशा ठिकाणी कामगारांना काम करताना किंवा कामाच्या अनुशंगाने काही कर्तव्ये बजावत असताना मृत्यू आल्यास किंवाकायमचे अपंगत्व आले, कारखान्यात काम करतांना व्यवसायजन्य रोग झाल्यास वैद्यकिय प्रमाणपत्राने सिध्द झाल्यास नुकसान भरपाई मिळू शकते. अशा अपघातात नुकसान भरपाई कामगारांस मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जातो. नुकसान भरपाईसाठी अर्ज जिल्हयाच्या नुकसान भरपाई आयुक्तांकडे (कामगार न्यायालय) करावा लागतो. हा अर्ज संबंधित कामगार, संघटना, वकिल यांचेमार्फत करता येतो.

३) **पर्यावरण नियंत्रण कायदा १९८६ व त्या खालील उत्पादन, साठवण, धोकादायक रसायनांची आयातविषयी नियम १९८९ व रासायनिक अपघात (आपत्ती योजना, प्रतिसाद, तयारी) नियम, १९९६ ची अंमलबजावणी.**

या नियमात धोकादायक रसायनांची यादी दिली आहे. कारखान्यात वरील नियमात नमुद केलेल्या प्रमाणाबाहेर साठवण, वापर होत असेल तर अशा कारखान्यांची गणना मोठे अपघात होऊ शकणारे कारखाने (मेजर ॲक्सिडेंट हॅजार्ड) मध्ये होते. अशा व्यवस्थापनांना सुरक्षितता व आरोग्यविषयक केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी लागून त्याविषयी हमी द्यावी लागते. कामगारांना वापरण्यात येणा-या रसायनांतील धोक्याची संपूर्ण माहिती द्यावी लागते व त्याविषयी हाताळणीसाठी प्रशिक्षण द्यावे लागते. कारखान्यात होणा-या दुर्घटनांवर वेळीच नियंत्रण ठेवण्यासाठी अंतर्गत अनर्थ निवारण योजना तयार करुन कार्यान्वित कराव्या लागतात. काही दुर्घटनात परिणामांची व्याप्ती कारखान्याबाहेर जाऊन आजुबाजूच्या रहीवाश्यांना हानी पोहचण्याचा संभव असतो, त्यासाठी जिल्हाधिका-यामार्फत जिल्हयासाठी बाहय अनर्थ निवारण योजना केली जाते. त्यासाठी त्यांना जरुन ती माहिती पुरविण्याची जबाबदारी व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे. रासायनिक अपघाताच्यावेळी नियंत्रण व अपघातस्थळी जाऊन तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होण्यासाठी राज्य, जिल्हा, स्थानिक स्तरीय अरिष्ट निवारण समुह या नियमाखाली संगठीत करण्यात आले आहेत.

अंमलबजावणीचे सोईसाठी संचालनालयाची कार्यालये

| पदाचे नांव | कार्यालयाचे नांव | | | |
|---|---|---|---|---|
| संचालक | मुंबई | | | |
| अपर संचालक | मुंबई | नागपूर | पुणे | |
| सह संचालक | मुंबई (४) | | | |
| | ठाणे | कल्याण | वसई | |
| | पनवेल | पुणे | कोल्हापूर | |
| | नाशिक | औरंगाबाद | अकोला | |
| उप संचालक | सांगली | धुळे | अमरावती | सातारा |
| | सोलापूर | जळगांव | चंद्रपूर | |
| | अहमदनगर | नांदेड | भंडारा | |

## औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात येणारी प्रमुख कामे.

१) कारखाने नियमांतर्गत परवाना देणे
२) कारखान्यांचे निरिक्षण करणे
३) कारखान्यातील अपघातांची चौकशी करणे, व प्रतिबंधक उपाययोजना सुचवून कार्यान्वित करणे.
४) तक्रारींची चौकशी करणे
५) धोकदायक कारखान्यांची विशेष तपासणी व त्यांच्याकडून अंतर्गत अनर्थ निवारण योजना तयार करुन घेणे
६) जिल्हास्तरीय अनर्थनिवारण योजना करणे (जिल्हाधिकारी यांना मदत)
७) धोकादायक कारखान्यातील कामगारांची बैद्यकिय तपासणी करणे व सर्वेक्षण करणे
८) सुरक्षिततेविषयी जाणीव व प्रसार करणे
९) कारखान्यांविषयी सांख्यिकी माहिती उपलब्ध करणे
१०) न्यायालयात खटले दाखल करणे व चालविणे
११) जिल्हा स्थानिक अरीष्ट समुह गटाचे सदस्यसचिव
१२) कल्याण अधिका-ची नोंदणी करणे

१) कारखाने अधिनियमाखालील परवान्याबाबत-

ज्या कारखान्यात १० किंवा १० पेक्षा जास्त कामगार अश्वशक्तीसह, २० किंवा २० पेक्षाजास्त कामगार अश्वशक्तीचा वार न करता उत्पादन प्रक्रियेत काम करतात क्ष्यांना परवाना घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे शासनाने अधिसूचना काढून कामगारांची संख्या कमी असून ज्यात पॉवरलूम सारखे उद्योग, लाकुड काम करण्याच्या सॉ मिल, धोकादायक रसायने वापरुन प्रक्रिया चालतात, ॲसबेसटॉस वापर अशा जागांना कारखाने अधिनियम लागू केले आहेत. त्यामुळे धोकादायक काम चालणा-या कारखान्यातील कामगारांना कायद्यानुसार संरक्षण मिळू शकते.

कारखान्यात उत्पादनाच्या किंवा त्या अनुषंगाने केल्या जाणा-या कामात जी व्यक्ती पगार घेते, वेतन किंवा वेतनाशिवाय, मालकास माहीत असो वा नसो, ती मुख्य मालकाकडून किंवा कंत्राटदाराकडून लावली असेल, तर ती व्यक्ती कामगार या व्याख्येत येते. कारखाने अधिनियमाखालील सर्व कायदे कंत्राटदारामार्फत लावलेल्या कामगारांनाही मिळतात.

**ज्या आस्थापनांना कारखाने अधिनियमाखाली नोंदणी करुन परवाना आवश्यक असतो त्यांनी किमान १५ दिवस आधी विहीत नमुना क्र.२ व ३ भरुन त्यासोबत परिशिष्टामध्ये नमुद केल्याप्रमाणे शुल्क भरावयाचे असते. हे फॉर्म संबंधितांना विनामुल्य दिले जातात. त्याची झेरॉक्स कॉपी किंवा टंकलेखित केलेली कॉपीसुध्दा स्विकारली जाते. त्यामुळे फॉर्मविषयी अडचण येत नाही. याशिवाय संबंधितांना इतारतीचे व मशिनरीच्या मांडणीचे नकाशे मंजूर करुन घ्यावे लागतात. सर्व फॉर्मची पूर्तता व नकाशाप्रमाणे इमारत व मशिनरीची मांडणी असल्याची तपासणी केल्यानंतर कारखान्यास परवाना दिला जातो. पूर्वी परवान्याचे नुतनीकरण करावे लगत असे परंतू ही मदत दहा वर्षापर्यंत वाढविल्यामुळे कारखानदारांना सोयीचे झाले आहे.**



५२

२) कारखान्याचे निरीक्षण -

कारखाने नियमांतर्गत नोंदणीकृत असलेल्या कारखान्यांचे प्रतिवर्षी किमान एकदा निरीक्षण करणे अपेक्षित आहे. परंतू सध्या मनुष्यबळा अभावी हे काम पूर्ण होत नाही. व्यवस्थापनाला लेखी निरीक्षण शेरे देऊन त्याची पूर्तता करुन घेण्यात येते. त्यामुळे कारखान्याची जागा व यंत्रसामुग्री अधिक सुरक्षित होण्यास मदत होते तसेच कायद्यानुसार मिळणा-या कल्याणकारी योजना, रजेचा पगार, कामाचे तास, यावरही नियंत्रण ठेवण्यात येते, निरीक्षाच्यावेळी उपस्थित असलेल्या संघटनेच्या प्रतिनिधीशी संपर्क साधण्यात येतो व करण्यात आलेल्या सुचनांच्या / तक्रारीच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही केली जाते. केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, संरक्षण, सार्वजनिक विभागाच्या अखत्यारीतील कारखान्याचे निरीक्षण केले जाते. निरीक्षणाद्वारे केल्या जाणा-या मार्गदर्शनासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. तसेच कारखाने तपासणीत माहित होणा-या बाबींची गोपनियता ठेवण्यात येते.

३) अपघातांची चौकशी व प्रतिबंधक उपाययोजना -

महाराष्ट्रातील कारखान्यांची संख्या वाढूनही न १९८१ साली ९९२००० इतक्या अपघातांची संया हळूहळू कमी होऊन सन २००७ मध्ये कमीहोऊन ४२४० इतकी खाली आली आहे. या संचालनालयाकडून कारखान्यात होणा-या गंभीर/ प्राणघातक अपघाताची सखोल चौकशी करण्यात येते. अपघातचे कारण शोधून काढून ते टाळण्यासाठी व्यवस्थापनास प्रतिबंधक उपाययोजना सुचविण्यात येवून त्याची पूर्तता करण्यास भाग पाडले जाते. अपघाताव्यतिरिक्त आग, स्फोट, वायूगळती, इमारती कोसळणे अशा घटनांची सखोल व उपाययोजना केली जाते. काही वेळा संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्यास त्याचवेळी उपलब्ध असलेला अधिकारी आदेशाची वाट न पाहता अपघात स्थळी जाऊन प्राथमिक चौकशी तातडीने करतो. अपघाताची चौकशी करताना परिस्थिती विषयी न्यायालयात अधिका-याकडूनच जबानी दिली जाते. कामगारांस शक्यतो न्यायालयात येऊन व्यवस्थापनाविरुध्द जबानी द्यावी लागणार नाही असा प्रयत्न केला जातो.

**अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसास नुकसान भरपाई कायद्यातील नुकसान भरपाई, सानुग्रह अनुदान मिळवून देण्यात मदत केली जाते. तसेच मृत कामगारांच्या कुटूंबियांतील व्यक्तीला नोकरी मिळवून देण्यासाठी व्यवस्थापनाकडे प्रयत्न केला जातो. गंभीर अपघातात कायमचे अपंगत्व आलेल्या कामगारालाही कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळवून दिली जाते. कारखान्याबाहेरील कामाच्या संदर्भातील प्राणघातक अपघातांची माहिती कामगार नुकसान भरपाई कायदा कलम १०(अ) अन्वये नुकसान भरपाई आयुक्तांना दिली जाते. अशी दिलेली माहिती नुकसान भरपाईविषयीचा दावा म्हणून कामगार न्यायालयात दाखल करुन घेण्यात येते.**

४) तक्रारींची चौकशी ---

संघटनेकडून कारखान्याशी संबंध नसलेल्या व्यक्तींकडून, निनावी किंवा दुरध्वनीवरुन तक्रार जरी प्राप्त झाली तरी संचालनालयाशी निगडीत असलेल्या सर्व तक्रारींची चौकशी करण्यात येते. व जरुर ती कार्यवाही करण्यात येते. तक्रार कर्त्यास केलेल्या कार्यवाहीविषयी उत्तर दिल्यानंतर वरिष्ठांच्या लेखी आदेशाने व कार्यवाही पूर्ण झाल्याची निश्चिती झाल्यानंतर ती तक्रार दप्तरी दाखल केली जाते. तक्रारीची चौकशी करताना तक्रारकर्त्याविषयी गोपनियता ठेवण्याची विशेष दक्षता बाळगण्यात येते.

५) धोकादायक कारखान्यांची तपासणी -

महाराष्ट्र राज्यात सुमारे ३००० लहान मोठे रासायनिक कारखाने असून त्यात ३५२ मोठे अपघात होऊ शकणारे (मेजर ॲक्सिडेंट हजार्ड) कारखाने आहेत. अशा कारखान्यांकडून अंतर्गत अनर्थ निवारण योजना तयार करुन घेतल्या जातात व त्याची प्रात्यक्षिकेही करण्यात येतात. अशा योजना काही रासायनिक कारखान्यात वायू, रसायनाची गळतीसारख्या

दुघटनेच्यावेळी कार्यान्वित केल्याने मोठया दुर्घटना टाळण्यास यश मिळाले आहे. संबंधित कारखान्यातील कामगारांना धोकादायक रसायनांच्या हाताळणीविषयी माहिती व प्रशिक्षण देण्यात येते.

६) राज्य स्तरीय अनर्थ निवारण योजना --

या संचालनालयाकडून धोकादायक कारखाने (मेजर ॲक्सिडेंट हजार्ड) शोधून काढून त्यांच्यासाठी जिल्हास्तरीय अनर्थ निवारण योजना तयार करण्यासाठी जिल्हाधिका-यांना जरुन ती तांत्रिक माहिती पुरविली जाते. दुर्घटनेच्यावेळी घटनास्थळी जाऊन तांत्रिक मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने जिल्हा, स्थानिक स्तरिय अरिष्ट निवारण समुहाचे संघटन करुन ते कार्यान्वित करण्याची कार्यवाही केली जाते. सर्व जिल्हयाच्या रासायनिक अपघाताविषयीच्या अनर्थ निवारण योजना अद्ययावत करण्याचे काम अग्रक्रमाने करण्यात येत आहे.

७) धोकादायक कारखान्यातील कामगारांची वैद्यकिय तपासणी व सर्वेक्षण --

या संचालनालयात कामगारांची आरोग्यविषयक तपासणी करण्यासाठी व धोकादायक कारखान्यातील कामाच्या जागेचे सर्वेक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती अत्याधुनिक उपकरणे असलेली प्रयोगशाळा सज्ज आहे. महाराष्ट्र कारखाने अधिनियमामध्ये धोकादायक प्रक्रिया असेलेले अनेक अनुबंध आहेत उदा. इलेक्ट्रोप्लेटींग शिसाच्या संपर्कात काम, ग्लास उत्पादन, शॉट ब्लास्टींग, कातडी कमावण्याचे काम, क्रोमिक ॲसिड, नायट्रो अमायनो कंपाउंड, धोकादायक जंतुनाशके, ॲस्बेसटॉस, मॅगनिज बेंझिग, रंग उत्पादन करणे, कापडाचे उत्पादन, कर्कश आवाजात काम करण्याचे विभाग इत्यादी. या प्रकारच्या वातावरणात काम केल्यामुळे विषबाधा, फुफ्फुसाचे रोग, कॅन्सर, कर्णबधिरता असे व्यवसायजन्य रोग होवू शकतात. या विभागाकडून केल्या जाणा-या वैद्यकिय तपासणीमुळे अशा प्रकारचे रोग होवून कायमची हानी होण्यापूर्वी उपाययोजना करण्यास मदत होते.

उदाणार्थ -- खालील धोकादायक जागेचे सर्वेक्षण करणे आवश्यक असते.

१) सिलिका ॲस्बेसटॉस - धुळीचा उपसर्ग

२) लेट क्रोमियम मरक्युरी (पारा)-- विषारी वाफांचा त्रास

३) बेंझिन, टॉल्विन, अमोनिया,
क्लोरिन नायट्रस फ्युम, सल्फर
डाय ऑक्साईड वाफा -- वाफांचा त्रास

अशा वातावरणात धोकादायक रसायनांच्या / पदार्थांच्या वाफा हया कामगारांच्या आरोग्यात हानी होणा-या प्रमाणापेक्षा कमी आहेत याची निश्चिती करण्यासाठी सर्वेक्षण करणे आवश्यक असते व ते या विभागा कडून केले जाते.

कामगारांच्या कामाच्या जागी वायूवीजन व उष्णतेमुळे होणारा परिणाम याचे सर्वेक्षण सुध्दा केले जाते. कर्कश आवाजाच्या वातावरणात राहिल्यामुळे कर्ण बधिरता होण्याची शक्यता असते. अशा आवाजाचीतीव्रता मोजून उपाय योजना करणे आवश्यक असते. अशा कामगारांची ऑडिओमेट्रीने तपासणी केली जाते. या प्रयोगशाळेत धोकादायक वातावरणात काम करण्या-या कामगारांच्या रक्त आणि लघवीच्या नमुन्याचे पृथःकरण अत्याधुनिक उपकरणांनी करण्याची सोय उपलब्ध आहे.

या विभागातील उप संचालक (वैद्यकीय) व प्रमाणक शल्य चिकित्सक यांच्याकडून तपासणी केली जाते. त्यासाठी कोणतेही शुल्क घेतले जात नाही. प्रत्येक जिल्हयाचे सिव्हिल सर्जन, व काही प्राधीकृत प्रमाणक शल्य चिकित्सक कायदयाखालील प्रमाणक शल्य चिकित्सकाचे काम करु शकतात.

**संचालक,**
**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,**
**कामगार भवन, ५ वा मजला, बांद्रा कुर्ला संकुल,**
**बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**

(विहित कालमर्यादा, विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.)

| अ क्र | विभागाकडून/ कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कलवधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | कारखान्याचे नकाशे मंजूर करणे (रासायनिक कारखाने) (विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठीकृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ६० दिवस (विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | संबंधित विभागातील अपर संचालक / सह संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |
| २ | कारखान्याचे नकाशे मंजूर करणे (इतर कारखाने) ((विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) ी.) | ४५ दिवस (विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | संबंधित विभागातील अपर संचालक / सह संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |
| ३ | कारखान्याच्या परवान्याचे नूतनीकरण करणे (विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ३० दिवस (विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी | संबंधित विभागातील अपर संचालक /सह संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ४ | कारखान्यास परवाना देणे<br>(विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.)<br>.) | १२० दिवस<br>(विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |
| ५ | तक्रारीची चौकशी करणे<br>(विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.)<br>.) | ९० दिवस<br>(विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | संबंधित विभागातील उप संचालक / सहायक संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |
| ६ | गंभीर अपघाताची चौकशी करणे<br>(विहित कागदपत्रे आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | ९० दिवस<br>(विहित कालमर्यादा, आणि अद्ययावत माहितीसाठी कृपया **www.mahashramm.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.) | संबंधित विभागातील उप संचालक / सहायक संचालक | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई २६५७२५०४/०९/२२/५८ |